संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# कोव्हीड-१९ संदर्भात विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता मार्गदर्शक सूचना

कोविड -१९ संदर्भात कामावर असतांना प्रत्येकाने खालील प्रमाणे काळजी घ्यावयाची आहे. आपल्या स्वतःच्या तसेच इतर सर्वांच्या आरोग्यासाठी खालील सूचनांचे तंतोतंत पालन होणे गरजेचे आहे. यासाठी आपले सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

१. विद्यापीठात असतांना प्रत्येकाने चेहऱ्यावर (नाका तोंडावर) मास्क लावणे जरूरी आहे.

२. चेहऱ्यावर मास्क असल्याशिवाय विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारातून विद्यापीठाच्या प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश मिळणार नाही.

३. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी थर्मल स्क्रीनिंग (Thermal Screening) ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याकरीता सर्वांनी सहकार्य करावे.

४. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये येणाऱ्या अभ्यांगतांची प्रवेश करण्यापूर्वी आपल्या विभागात असलेल्या नोंदवहीत माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच सोबत ओळख पत्र (Identity Proof) असणे जरूरी आहे. त्या शिवाय त्यांना विभागात प्रवेश देऊ नये. सर्व अधिकारी/कर्मचारी/शिक्षक यांनी आपल्याला भेटावयास येणाऱ्यांना तशा सूचना द्याव्यात.

५. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येकाने आपल्या हाताचे निर्जंतुकीकरण (sanitization) करावे.

६. अभ्यागतांनी व अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये बोलतांना दोन व्यक्तींमध्ये ६ फूट अंतर (Physical Distancing) ठेवून बोलावे.

७. विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये कोणीही तंबाखू, गुटखा, पान खाऊन थुंकण्यास सक्त मनाई आहे. थुंकतांना आढळून आल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

८. विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये कोणीही धुम्रपान करू नये.

९. विद्यापीठाच्या सर्व अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांनी आपल्या मोबाइल वर आरोग्य सेतू ॲप स्थापित (Install) करणे अनिवार्य आहे. त्याची शहानिशा सर्व विभाग प्रमुखांनी करावी.

१०. कोणत्याही अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांला सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी असे लक्षण असल्यास त्याने ताबडतोब विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा व त्यांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार करून घ्यावा. सदर व्यक्तीची माहिती आरोग्य अधिकारी ताबडतोब प्रशासनाला / शासकीय रुग्णालयास कळवतील.

११. कोणत्याही अधिकारी, कर्मचारी, शिक्षक किंवा अभ्यांगताला थर्मल स्क्रीनिंग दरम्यान ताप आढळून आल्यास सदर व्यक्तीने विद्यापीठाच्या आरोग्य विभागात जाऊन तपासणी करावी.

१२. विद्यापीठात कामाच्या व्यतिरिक्त कोणीही आपले विभाग सोडून दुसऱ्या विभागात तसेच इतरत्र जाऊ नये.

१३. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना वरील सर्व बाबींबाबत अवगत करावे.

१४. विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या विभागाव्यतिरिक्त इतर ठिकाणी ४-५ पेक्षा जास्त संख्येत एकत्र येऊ नये. चार-पाच व्यक्ती एकत्र येत असल्यास Physical Distancing चे पालन करावे.

(डॉ.स्मिता थोरात)
आरोग्य अधिकारी

(डॉ.तु.रा.देशमुख)
कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कोव्हिड-१९ संदर्भात विद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांसाठी सूचना

कोविड-१९ संदर्भात कामानिमित्त विद्यापीठात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताने खालीलप्रमाणे काळजी घ्यावयाची आहे. आपल्या स्वतःच्या तसेच इतर सर्वांच्या आरोग्यासाठी खालील सूचनांचे तंतोतंत पालन होणे गरजेचे आहे. यासाठी आपले सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

१. अभ्यागतांने विद्यापीठात असतांना चेहऱ्यावर (नाका तोंडावर) मास्क लावणे जरूरी आहे.

२. चेहऱ्यावर मास्क असल्याशिवाय विद्यापीठात व विद्यापीठाच्या प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश मिळणार नाही.

३. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी थर्मल स्क्रीनिंग (Thermal Screening) होणे अनिवार्य आहे. त्याकरीता मुख्य प्रवेशद्वारावर व्यवस्था करण्यात आलेली आहे. कृपया सर्वांनी सहकार्य करावे.

४. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी अभ्यागतांनी विभागात असलेल्या नोंदवहीत आपली माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच सोबत ओळख पत्र (Identity Proof) असणे जरूरी आहे. त्या शिवाय कोणत्याही विभागात प्रवेश मिळणार नाही.

५. प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी अभ्यांगताने आपल्या हाताचे निर्जंतुकीकरण (sanitization) करावे.

६. अभ्यागतांनी विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये बोलतांना दोन व्यक्तींमध्ये ६ फूट अंतर (Physical Distancing) ठेवून बोलावे.

७. विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये कोणीही तंबाखू, गुटखा, पान खाऊन थुंकण्यास सक्त मनाई आहे. थुंकतांना आढळून आल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

८. विद्यापीठ परिसरात किंवा विभागामध्ये कोणीही धूम्रपान करू नये.

९. अभ्यागताला थर्मल स्क्रीनिंग दरम्यान ताप आढळून आल्यास सदर व्यक्तीस विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर/ विभागात प्रवेश नाकारण्यात येईल.

१०. अभ्यागतांनी विद्यापीठात कामाच्या व्यतिरिक्त इतर विभागात तसेच इतरत्र जाऊ नये.

११. विद्यापीठ परिसरात/प्रशासकीय विभागात अभ्यागतांनी चार-पाच व्यक्तींपेक्षा जास्त संख्येत एकत्रित येऊ नये. चार किंवा पाच व्यक्ती एकत्रित येत असल्यास Physical Distancing चे पालन करावे.

(डॉ.स्मिता थोरात)
आरोग्य अधिकारी

(डॉ.तु.रा.देशमुख)
कुलसचिव